**नवीन बांबू धोरण जाहीर करणे व त्या धोरणाची व्यापक अंमलबजावणी करिता चिचपल्ली जि. चंद्रपूर येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्र. इएसटी-२०१३/प्र.क्र.६४/भाग-२/फ-९**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक : ४ डिसेंबर, २०१४**

**वाचा :-** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र.कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र. ५७ (१३-१४)/१०९६, दिनांक ३१.८.२०१३ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

बांबू एक अत्यंत महत्वाचे वनोपज असून, वनालगत असलेल्या ग्रामिण व आदिवासी जीवनात बांबूचे महत्वाचे स्थान आहे. वनालगत असलेल्या ग्रामिण व आदिवासी लोकांची उपजिवीका बांबू व बांबूवर आधारीत लघुउद्योगावर अवलंबून असते. अशा बहुपरिर्चीत बांबूचा उपयोग घरगुती वापर, कुंपण करणे, शेती उपयोगी कामाकरीता, विविध हस्तकला वस्तू जसे तट्टे, सुपे, टोपल्या, शिडी, बांधकामाचे साहित्य, फर्निचर व विविध हस्तकलासाठी होतो. सद्यःस्थितीत बांबू व्यवसाय करणारे कारागिर पारंपारीक पध्दतीचा वापर करीत असल्याने, त्यांना त्यांच्या मेहनतीच्या प्रमाणात आर्थिक उत्पन्न प्राप्त होत नाही.

महाराष्ट्रातील वनक्षेत्रापैकी जवळ-जवळ १३% क्षेत्रावर बांबू आढळतो. राज्यात जवळपास २,३०,००० मे.टन इतके बांबूचे उत्पादन असून, त्यापैकी सुमारे ९०% पेक्षा जास्त बांबू गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयात मिळतो. नैसर्गिक व खाजगी क्षेत्रात बांबू लागवड व योग्य व्यवस्थापन करून बांबूच्या उत्पादनामध्ये तसेच बांबूवर आधारीत उद्योजकांना चालना देणे व बांबूचा मुल्यवर्धीत उपयोग वाढवणेकरीता, नवीन बांबू धोरण जाहीर करण्याचे शासनाचे विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यात पुढील प्रमाणे नवीन बांबू धोरण जाहीर करण्यात येत आहे :-

१. खाजगी जमिनीवर आदिवासी उपयोजना व इतर योजनेअंतर्गत बांबू लागवडीस प्रोत्साहन देणे.

२. खाजगी जमिनीवरील बांबूस वाहतुक पासच्या बंधनातून मुक्त करणे.

३. ज्या क्षेत्रात बांबू उपलब्ध आहे, त्या क्षेत्रातील उद्योगांना E-auction पध्दतीने पारदर्शकरीत्या बांबू पुरवठा करणे.
४. महाराष्ट्र राज्यातील सर्व बुरुड कामगारांना वन विभागाकडे नोंदणी करुन त्यांना स्वामित्व शुल्क (Royalty) तसेच वनविकास कर न आकारता बांबू पुरवठा करणे.
५. शास्त्रोक्त पध्दतीने बांबू लागवड व औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण व प्रसार करण्यासाठी चिचपल्ली, जि. चंद्रपूर येथे प्रशिक्षण केंद्राची स्थापना करणे.
६. ज्या गावाजवळच्या वनक्षेत्रात बांबू आढळतो अशा गावातील स्थानिक गावकऱ्यांना संयुक्त वनव्यवस्थापन समिती व ग्रामवन समितीमार्फत बांबूचे निष्कासन व जतन करण्याचा अधिकार देणे.

वरील प्रमाणे बांबू धोरणाची व्यापक अंमलबजावणी करण्याकरिता शास्त्रोक्त पध्दतीने बांबू लागवड व औद्योगिक वापरासाठी व प्रसार करण्यासाठी चिचपल्ली, जि. चंद्रपूर येथे संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्याची आवश्यकता आहे.

चंद्रपूर जिल्हयामध्ये किंवा जिल्हयालगत कोणतीही बांबू प्रशिक्षणाची सुविधा नसल्यामुळे येथील बांबू कारागीर त्यापासून वंचित राहीले आहेत. पर्यायाने त्यांना पाहिजे त्याप्रमाणात मोबदला प्राप्त होत नाही. अशा प्रकारच्या प्रशिक्षणामुळे जिल्हयातील बेरोजगारांना नवीन रोजगाराची संधी उपलब्ध होईल. चंद्रपूर पासून २० कि.मी. अंतरावर चंद्रपूर ते गडचिरोली मुख्य रस्त्यावर चिचपल्ली गाव आहे. येथे महसूल विभागाकडून आवश्यक ती जमीन प्राप्त करून घेवून, शास्त्रोक्त पध्दतीने बांबू लागवड व औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण व प्रसार करण्यासाठी चिचपल्ली, जि. चंद्रपूर येथे प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण केंद्र जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार मौजे. चिचपल्ली, जि.चंद्रपूर, सर्वे क्र.६/१, आराजी १४.५२ हे.आर पैकी ५.०० हे. आर जागेवर बांधण्यात येणार आहे. याकरिता, महसूल विभागाने मान्यता दिल्यानुसार आवश्यक असल्यास दिनांक १२.७.२०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे ग्रामपंचायत / ग्रामसभा तसेच जिल्हापरिषदेची मान्यता घेण्यात यावी. सदर जागेस वनसंवर्धन अधिनियम, १९८० मधील तरतूदी आकृष्ट होत असतील तर केंद्र शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून, सदर प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात येईल.

या प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीच्या बांधकामाच्या अनुषं-गाने आवश्यक अंदाजपत्रक मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांच्या मान्यतेने सबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर यांच्याकडून प्राप्त करून घेऊन त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची सहमती प्राप्त करून घेण्यात येईल.

या प्रकल्पाची उद्दिष्टये साध्य होण्यासाठी डायरेक्टर जनरल ऑफ एम्प्लायमेंट अँड ट्रेनिंग, भारत सरकार यांच्यातर्फे बांबूवर आधारीत मान्यताप्राप्त अभ्यासक्रम सुरु करण्यात येईल.

त्यानुषंगाने (MES) मॉडयूलर एम्प्लाएबल स्किल्स अंतर्गत पुढील प्रशिक्षण कार्यक्रमांना घेण्यात येतील १) बांबू प्रोसेसिंग, २) सेकंडरी बांबू प्रोसेसिंग, ३) बांधाकामासाठी बांबूचा उपयोग आणि ४) बांबू हँडीक्राफ्ट वस्तू, फर्निचर तयार करणे. याशिवाय प्रशिक्षणार्थ्यांना स्वयंरोजगारयुक्त प्रगत प्रकारचे (Advanced) प्रशिक्षण - १) बांबू टर्निंग प्रॉडक्ट, २) फाईन बांबू प्रॉडक्ट हे अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील.

सदर प्रशिक्षण केंद्राकरिता एकूण आवर्ती रू. २५१.४४ लक्ष व अनावर्ती खर्च रू. ८६०.६९ लक्ष असा एकूण रू.१११२.१३ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुषंगाने मंजूरीबाबतची विहीत कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

तसेच, चिचपल्ली जि. चंद्रपूर येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यास आवश्यक असणारी खालील पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| १. संचालक (डायरेक्टर) | - १ पद, (उपवनसंरक्षक दर्जाचे अधिकारी प्रतिनियुक्ती द्वारे) (वेतनश्रेणी रू.१५६००-३९१०० - ग्रेड पे ७६००) |
| २. पर्यवेक्षक | - १ पद (वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० - ग्रेड पे ४८००) |
| ३. हस्तशिल्प निर्देशक | - २ पद (वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० - ग्रेड पे ४४००) |
| ४. वनपाल | - १ पद (वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० - ग्रेड पे ४४००) |
| ५. मशिन निर्देशक | - २ पद (वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० - ग्रेड पे ४३००) |
| ६. लेखापाल | - १ पद (वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० - ग्रेड पे ४२००) |
| ७. लिपिक | - १ पद (वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० - ग्रेड पे २८००) |
| ८. वनरक्षक | - १ पद (वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० - ग्रेड पे २४००) |
| ९. वाहनचालक | - १ पद (वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० - ग्रेड पे २०००) |
| १०. सहाय्यक मशिन निर्देशक | - २ पद (वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० - ग्रेड पे १९००) |
| ११. देखभाल सेवक | - १० पद (वेतनश्रेणी रु. ४४००-७४४० - ग्रेड पे १६००) |

१२. इस्टेट मॅनेजर, केअर टेकर व चौकीदार यांच्या सेवा सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी मधून मानधनावर घेण्यात येतील.

सदर प्रशिक्षण संस्था मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर यांच्या नियंत्रणाखाली राहील.

सदर शासन निर्णय महसूल विभाग, नियोजन विभाग तसेच वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३३३/२०१४, दिनांक २१.११.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(डॉ.यु.एम.फारुकी)**
**सह सचिव (वने)**
**महसूल व वन विभाग**

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महासंचालक, सामाजिक वनीकरण महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ट वनोपज, सनियंत्रण व मुल्यांकन ),महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
९. विभागीय आयुक्त, नागपूर.
१०. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, आदिवासी विभाग.
११. जिल्हाधिकारी, नागपूर.
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.
१३. सर्व मुख्य वनसंरक्षक.
१४. प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर.
१५. सर्व उपवनसंरक्षक
१६. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१७. महालेखापाल-२ (लेखा परिक्षा), नागपूर
१८. वित्त विभाग (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२
१९. नियोजन विभाग (कार्यासन-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२
२०. निवड नस्ती, फ-९ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

E:Nilesh\2013\C R 64\ Chichpalli